MHGA090003992020

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०७.०७.२०२० |
| नोंदणी तारीख | : | ०७.०७.२०२० |
| निकाल तारीख | : | १२.०३.२०२६ |
| कालावधी | : | ०५ वर्षे., ०८ म., दि.०५ |

**नि.क्र. २६**

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी यांचे न्यायालय**<br>(पीठासीन अधिकारी एस. ए. भैसारे यांचे समोर)<br>(न्यायनिर्णयाची तारीख :१२/०३/२०२६)<br>**सं.फौ.मा.क्र. १९९/२०२०** |
| | गुन्हा क्र. : १४५/२०१९<br>पोलिस स्टेशन, आष्टी |
| **तक्रारदार** | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलिस स्टेशन अधिकारी,<br>पोलिस स्टेशन, आष्टी |
| **अधिवक्ता** | सहा.सरकारी अभियोक्ता श्री.डि.व्हि.दोनाडकर |
| **आरोपी** | **कपील नामदेव आत्राम,<br>वय- ३१ वर्षे, धंदा- शेती,<br>राह.-चंदनखेडी खर्डी,<br>तह.चामोर्शी, जि. गडचिरोली.** |
| **अधिवक्ता** | श्री. एम.डी.सहारे, आरोपीचे वकील. |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | १५.१०.२०१९ |
| प्रथम खबरेची तारीख | १५.१०.२०१९ |
| आरोपपत्राची तारीख | ०७.०७.२०२० |
| अपराधाचा तपशिल तयार करण्याची तारीख | २९.११.२०२२ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | ०९.१०.२०२३ |
| निकाल राखून ठेवल्याची तारीख | काही नाही |
| निकालाची तारीख | १२.०३.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | काही नाही |

## <u>आरोपीचा तपशिल</u>

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **कपील नामदेव आत्राम** | कलम ४१(अ)(१) फौ.प्र.सं. अन्वये सोडण्यात आले | दिनांक ०७.०७.२०२० | कलम ६५(फ) म.दा.का. | निर्दोष मुक्त | नाही | नाही |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयातील साक्षीदारांची यादी

**अ. <u>अभियोग पक्ष</u> :-**

| सा.क्र. | नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्य किय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| १ | हर्षा बंडु खेडेकर | १६ | पंच |
| २ | प्रियंका प्रवीण सेडमाके | २० | पंच |

**ब. <u>आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर</u> :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**क. <u>न्यायालयाकडुन साक्षीदार, जर असेल तर</u> :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

## फिर्यादी पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातील निशाणी क्रमांकाची यादी

**अ. फिर्यादी पक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१७ | घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील सही |
| २. | नि.क्र.१८ | मालमत्ता शोध व जप्ती नमुनावरील सही |
| ३. | नि.क्र.१९ | सुचनापत्रावरील सही |
| ४. | नि.क्र.२१ | घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरील सही |
| ५. | नि.क्र.२२ | मालमत्ता शोध व जप्ती नमुनावरील सही |
| ६. | नि.क्र.२३ | सुचनापत्रावरील सही |

**ब. बचाव पक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र.११ | दोषारोप |

**ड. वस्तु क्रमांक :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | |

## न्या य नि र्ण य

(दिनांक १२ मार्च २०२६ रोजी घोषित)

आरोपीवर कलम ६५(फ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ दंडनीय अपराधांकरिता दोषारोप ठेवण्यात आले आहे.

२. सदर प्रकरणात माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपी विरुध्द निशाणी क्र.११ वर कलम ६५ (फ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम,१९४९ अन्वये आरोपीवर दोषारोप ठेवले. दोषारोपातील

आरोप आरोपीला वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल नाही असे नि.क्र. १२ वर सांगितले. त्यामुळे प्रस्तुतचा खटला भरविण्यात आला. आरोपीचा बचावात्मक प्रतिवाद संपुर्णत: नाकबुलीचा आहे. त्यानंतर नि.क्र. ०१ वर आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला तसेच आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन न आल्याने त्याच्याविरुध्द कलम ३१३ (१)(ब) फौ.प्र.सं. प्रमाणे बयाण नोंदविण्यात आले नाही.

३. वरील विवेचनावरुन खालील मुद्दे माझे समोर उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणानुसार त्यांचे समोर नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दिनांक १५.१०.२०१९ रोजी १६:०० ते १३:४० वाजता मौजा-चंदनखेडी, तह. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली येथे आरोपीच्या ताब्यातुन १०० लिटर गुळामोहाचा सडवा एकुण किंमत रक्कम ७,०००/- रूपयाचा मुद्देमाल अवैध्यरित्या विनापरवाना दारु काढण्याच्या उददेशाने मिळुन आल्याचे सरकार पक्षाने सिध्द् केले आहे काय ? | **... नाही** |
| २ | आदेश काय ? | **आरोपीस दोषमुक्त करण्यात येते.** |

४. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता **श्री. डि.व्हि.दोनाडकर** व आरोपीचे विद्वान वकील **श्री.एम.डी.सहारे** यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

## कारणे-मिमांसा

### मुद्दा क्र.१ व २ करिता :-

५. अभियोग पक्षातर्फे पंच (सा.क्र.१) व (सा.क्र.२) यांना तपासले. त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, पोलिसांनी त्यांना पंचनाम्याकरीता कुठेही बोलावले नाही तसेच त्यांनी त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा किंवा जप्ती तयार करण्यात आलेला नाही. अभियोग पक्षाने त्यांचा उलटतपास घेतला असता काहीही निष्पन्न झाले नाही.

६. वरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, स्वतंत्र पंच साक्षीदार क्र. १ व २ यांनी अभियोग पक्षास पुर्णपणे सहकार्य केलेले नाही व त्यांच्या समक्ष आरोपीच्या

ताब्यातुन कुठल्याही प्रकारची दारु जप्त करण्यात आली नाही हे सुध्दा सिध्द होवु शकले नाही. अभियोग पक्ष पुराव्या कायदयाप्रमाणे आरोपीचा घटनेतील दारुवर जाणिवपुर्वक ताबा होता हे सिद्ध करण्यास अपयशी ठरले. पुराव्या कायद्याप्रमाणे स्वतंत्र साक्षदारांकडुन पंचनामे सिद्ध झाले नाहीत व पुराव्यांची साखळी पुर्ण झाली नाही. सबब संशयाचा फायदा आरोपीला देणे संयुक्तीक ठरतो. त्यामुळे आरोपीविरुध्द कलम ६५(फ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ नुसार लावण्यात आलेले दोषारोप सिध्द झालेले नाहीत. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे. आरोपी आज न्यायालयात गैरहजर आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५३ (६) प्रमाणे न्यायनिर्णय आरोपीच्या गैरहजरीत देता येवु शकतो. मुद्दा क्र.२ अन्वये खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी **कपील नामदेव आत्राम** याची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५ (१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(फ) या गुन्हयाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुददेमाल घटनास्थळावर नाश केला असल्याने त्याबाबत कोणताही आदेश नाही.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम-४३७(अ) प्रमाणे रुपये १५,०००/- चे बंधपत्र व जमानत दाखल करावे.
(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

स्वा/-
(एस. ए. भैसारे)
न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे.,
चामोर्शी

स्थळ : चामोर्शी.
दिनांक : १२/०३/२०२६.